Vol II Issue VII Jan 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 7, Jan. 2013
ISSN:-2231-5063
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# *परभणी जिल्हयातील डाकघर वितरण : एक भौगोलिक अभ्यास*

*सदानंद गोने*

उज्वल ग्रामीण महाविद्यालय,घोणसी ता.जळकोट जि.लातूर

***सारांश***

मानवी भूगोल या शाखेत लोकसंख्येस पूरविल्या जाणाऱ्या विविध सेवांचा अभ्यास केला जातो. विविध प्रदेशातील लोकांच्या संदेशवहनासाठी त्या–त्या प्रदेशातील लोकांना डाक सेवा मूबलक प्रमाणात पुरविणे आवश्यक आहे. डाक घर केंद्रामार्फत पुरविली जाणारी संदेशवहन सेवा ही एक प्रमुख सेवा आहे. जिल्हयात एकूण 176 डाक घर आहेत. जिल्हयातील एकूण डाक घरांपैकी सर्वाधिक 39 डाक घर हे जिंतूर तालुक्यात आहेत. तर सर्वात कमी डाक घर हे सोनपेठ तालुक्यात 10 एवढे आहेत. यावरुन जिल्हयात डाक घराचे वितरण हे असमान स्वरुपाचे असलेले दिसून येते. डाक घराच्या भौगोलिक वितरणाचा अभ्यास करण्यासाठी जिल्हयातील एकूण ग्रामीण क्षेत्र, ग्रामीण वस्त्या व ग्रामीण लोकसंख्या या भौगोलिक घटकांचा आधार घेतलेला आहे. जिल्हयातील उपलब्ध असलेल्या या डाक घराची संख्या आणि ग्रामीण क्षेत्र, ग्रामीण वस्त्या व ग्रामीण लोकसंख्या यांच्या प्रमाणात पुरेशी आहे किंवा नाही याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला गेला आहे.

## ***प्रस्तावना :–***

जिल्हयातील ग्रामीण क्षेत्र, ग्रामीण वस्त्या, ग्रामीण लोकसंख्या व डाक घर यांच्या प्रमाणाचा अभ्यास केला असता संपूर्ण जिल्हयात ग्रामीण क्षेत्र व लोकसंख्येच्या प्रमाणात एकूण 176 डाक घराची आवश्यकता आहे. परंतु वस्त्यांच्या प्रमाणात संपूर्ण जिल्हयात 175 डाक घराची आवश्यकता आहे. विविध तालुक्यात हेच प्रमाण कमी अधिक असल्याचे दिसून येते.

## **अभ्यास क्षेत्र :**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी परभणी जिल्हा हा अभ्यास क्षेत्र म्हणून निवडला आहे. हा जिल्हा महाराश्ट्राच्या पूर्व विभागातील जिल्हा असून त्याचा 18058' उत्तर ते 19050' उत्तर अक्षवृत्त आणि रेखावृत्तीय विस्तार 76013' पूर्व ते 77012' पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. या जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 6511 चौ.कि.मी. एवढे असून ते महाराश्ट्र राज्याच्या 2.11 टक्के एवढे आहे. सन 2001 च्या जनगणनेनुसार या जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 1491109 एवढी असून ती महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या 2.76 टक्के एवढी आहे. या जिल्ह्यात एकूण नऊ तालुके असून 830 ग्रामीण वस्त्या आणि 176 डाक घर आहेत. अभ्यास क्षेत्रात परभणी, गंगाखेड, पूर्णा, सोनपेठ, पाथरी, मानवत, सेलू, जिंतूर व पालम हे नऊ तालुके आहेत. यातील पालम वगळता सर्व तालुके नागरी वस्त्या आहेत. तर पालम हे तालुक्याचे ठिकाण असूनसुध्दा ते ग्रामीण वस्तीचे ठिकाण आहे. (नकाशा क्र.1)

**Title:** *परभणी जिल्हयातील डाकघर वितरण : एक भौगोलिक अभ्यास*
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** *सदानंद गोने* **yr:2013 vol:2 iss:7**




**नकाशा क्र.1**

**उद्दिश्टये :**

परभणी जिल्हयातील डाक घराच्या भौगोलिक वितरणाचा अभ्यास करणे हे मुख्य उद्दिश्टय समोर ठेवून प्रस्तुत शोधनिबंध तयार केलेला आहे.

**आकडेवारी संकलन व अभ्यास पध्दती :**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी वापरलेली आकडेवारी ही दुय्यम स्वरुपाची असून ती जिल्हयाच्या वेगवेगळया अहवालावरुन घेतलेली आहे. त्याकरिता जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, जिल्हा गॅझीटीयर, जिल्हा जनगणना अहवाल इत्यादींमधून ही माहिती संकलित केलेली आहे. तसेच संकलीत केलेल्या आकडेवारीनुसार संस्करण करुन ती वापरण्यात आलेली आहे. परभणी जिल्हयातील ग्रामीण वस्तीमध्ये उपलब्ध असलेले डाक घर या सुविधांच्या क्षमतेची गणना करुन श्रेणी निश्चित केलेली आहे.

डाक घर या सेवा सुविधांच्या क्षमतेची निश्चित करण्यासाठी खालील समीकरणाचा उपयोग केलेला आहे.

$$Xie = \frac{Pi}{MP}$$

Xie= तालुक्यातील सेवा सुविधांची अपेक्षित संख्या

Pi= तालुक्यातील एकूण ग्रामीण लोकसंख्या

MP=जिल्हयातील प्रति एका सुविधेवर अवलंबून असलेली लोकसंख्या

$$MP = \frac{P}{Fi}$$

P= जिल्हयातील एकूण लोकसंख्या

Fi= प्रत्येक एका सेवा सुविधांची एकूण संख्या

**डाक घरांचे वितरण :**

संपूर्ण जिल्हयात एकूण 176 डाक घर आहेत. यापैकी सर्वाधिक 39 डाक घर हे जिंतूर तालुक्यात तर सर्वात कमी डाक घर हे सोनपेठ तालुक्यात 10 एवढी आहेत. परभणी जिल्हयातील तहसिलनिहाय डाक घराच्या वितरणाचा अभ्यास केला असता हे वितरण असमान असल्याचे दिसून येते. जिंतूरनंतर परभणी तालुक्यात 29, गंगाखेड 24, पाथरी व सेलू तालुक्यात प्रत्येकी 17, पालम 14 आणि पूर्णा व मानवत तालुक्यात प्रत्येकी 13 डाकघर असल्याचे दिसून येते.

परभणी जिल्हयातील डाक घराचे वितरण हे असमान असल्यामुळे काही तालुक्यात डाक घराची संख्या अधिक आहे तर काही

तालुक्यात डाक घराची संख्या कमी आहे. ज्या तालुक्यात डाक घराची संख्या अधिक आहे. त्या तालुक्यातील लोकांना संदेशवहन सेवा पुरेशा प्रमाणात मिळतात. तर ज्या तालुक्यात डाक घरांची संख्या कमी आहे त्या तालुक्यातील लोकांना मिळणाऱ्या संदेशवहन सुविधा या अतिशय कमी प्रमाणात मिळतात.

संदेशवहन सेवा पुरेशा प्रमाणात मिळण्याकरिता त्या प्रदेशात पुरेसे डाक घर उपलब्ध असावी लागतात यासाठी अभ्यास क्षेत्रातील एकूण ग्रामीण क्षेत्र एकूण ग्रामीण वस्त्या व एकूण ग्रामीण लोकसंख्या यांच्या प्रमाणावरुन डाक घराचा अभ्यास केला आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, काही तालुक्यात डाक घर अतिरिक्त आहेत तर काही तालुक्यात डाक घराची कमतरता असल्याचे दिसून येते.

परभणी जिल्हयात असलेल्या डाक घरांचा आणि ग्रामीण क्षेत्र, ग्रामीण वस्त्या व ग्रामीण लोकसंख्या यांच्या प्रमाणाचा अभ्यास केला असता दर 36.15 चौ.कि.मी. ला एक डाक घर असणे गरजेचे आहे. तर वस्त्यांच्या प्रमाणात हेच प्रमाण दर 4.72 वस्त्यासाठी एक डाक घर आणि दर 5712 लोकसंख्येमागे एका डाक घराची आवश्यकता आहे.

**ग्रामीण क्षेत्र आणि अपेक्षित डाक घर :**

संपूर्ण अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण क्षेत्राच्या प्रमाणात अपेक्षित डाक घराचा अभ्यास केला असता संपूर्ण अभ्यास क्षेत्रात 176 डाक घराची आवश्यकता आहे. तहसिलनिहाय ग्रामीण क्षेत्र आणि अपेक्षित डाक घरांचा अभ्यास केला असता सर्वाधिक डाक घर जिंतूर तालुक्यात 34 एवढे असणे गरजेचे आहे तर सर्वात कमी 11 एवढे डाक घर सोनपेठ तालुक्यात अपेक्षित आहेत. जिंतूर नंतर परभणी तालुक्यात 29, सेलु 21, पूर्णा 20, गंगाखेड, पालम व पाथरी या तालुक्यात प्रत्येकी 16 व मानवत तालुक्यात 13 डाक घर ग्रामीण क्षेत्राच्या प्रमाणात असणे अपेक्षित आहे.

**ग्रामीण वस्त्या व अपेक्षित डाक घर :**

परभणी जिल्हयातील एकूण ग्रामीण वस्ती व डाक घरांच्या प्रमाणाचा अभ्यास केला असता दर 4.72 ग्रामीण वस्तीमागे एक डाक घर असणे गरजेचे आहे. तहसिलनिहाय वस्ती व डाक घराच्या प्रमाणाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, सर्वाधिक 35 डाक घर जिंतूर तालुक्यात असले पाहिजेत तर सर्वात कमी डाक घर मानवत तालुक्यात 11 एवढे असले पाहिजेत. परभणी तालुक्यात 27, गंगाखेड 22, सेलु 20, पूर्णा 19, पालम 17, सोनपेठ आणि पाथरी तालुक्यात प्रत्येकी 12 डाक घर ग्रामीण वस्त्यांच्या प्रमाणात असने अपेक्षित आहेत.

**ग्रामीण लोकसंख्या व अपेक्षित डाक घर :**

ग्रामीण लोकसंख्या आणि डाक घरांचे प्रमाण पाहिले असता दर 5712 लोकसंख्येमागे एक डाक घर असणे अपेक्षित आहे. ग्रामीण लोकसंख्या व डाक घर यांच्या प्रमाणाचा तहसिलनिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक 35 डाक घर परभणी तालुक्यात असणे गरजेचे आहे. तर सर्वात कमी डाक घर सोनपेठ तालुक्यात 09 असणे गरजेचे आहे. परभणीनंतर जिंतूर तालुक्यात 28, पूर्णा 23, गंगाखेड 22, सेलु 17, पालम 16, पाथरी 14 आणि मानवत तालुक्यात 12 डाक घर ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणात असणे गरजेचे आहे.

**ग्रामीण क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्येच्या प्रमाणात सरासरी अपेक्षित डाक घर :**

ग्रामीण क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्या व डाक घराच्या प्रमाणाचा अभ्यास केला असता याचे प्रमाण वेगवेगळे आलेले दिसून आलेले आहे. क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्यांच्या प्रमाणानुसार आवश्यक असलेल्या डाक घराची सरासरी काढली असता या तिन्ही घटकांचे सरासरी डाक घर हे सर्वाधिक 32 जिंतूर तालुक्यात असणे गरजेचे आहे. तर सर्वात कमी 11 डाक घर हे सोनपेठ तालुक्यात असणे गरजेचे आहे. परभणी तालुक्यात 30, पूर्णा 21, गंगाखेड 20, सेलु 19, पालम 16, पाथरी 14 आणि मानवत तालुक्यात 12 डाक घर अपेक्षित आहेत.

**तक्ता क्र.1**

**परभणी जिल्हयातील डाक घराचे वितरण (2001)**

| तहसिल | डाक घरांची संख्या | ग्रामीण क्षेत्र चौ. कि.मी. | ग्रामीण वस्त्यांची संख्या | ग्रामीण लोकसंख्या | क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्येच्या प्रमाणात अपेक्षित डाक घर | | | सरासरी अपेक्षित डाक घर | प्रत्यक्षात आणि अपेक्षित डाक घरातील बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | क्षेत्र | गाव | लोकसंख्या | | |
| परभणी | 29 | 1055 | 128 | 199222 | 29 | 27 | 35 | 30 | +01 |
| गंगाखेड | 24 | 589 | 105 | 123617 | 16 | 22 | 22 | 20 | –04 |
| पालम | 14 | 561 | 81 | 927936 | 16 | 17 | 16 | 16 | +02 |
| सोनपेठ | 10 | 380 | 57 | 53728 | 11 | 12 | 09 | 11 | +01 |
| पूर्णा | 13 | 728 | 92 | 129057 | 20 | 19 | 23 | 21 | +08 |
| पाथरी | 17 | 590 | 56 | 782584 | 16 | 12 | 14 | 14 | –03 |
| मानवत | 13 | 479 | 54 | 67799 | 13 | 11 | 12 | 12 | –01 |
| सेलू | 17 | 748 | 93 | 99495 | 21 | 20 | 17 | 19 | +02 |
| जिंतूर | 39 | 1231 | 164 | 161956 | 34 | 35 | 28 | 32 | –07 |
| विभाग | 176 | 6363 | 834 | 1005323 | 176 | 175 | 176 | 175 | — |

स्त्रोत : जिल्हा आर्थिक, सामाजिक समालोचन, परभणी जिल्हा 2001

**प्रत्यक्ष व अपेक्षित डाक घरातील बदल :**

अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण क्षेत्र, वस्त्या, लोकसंख्या आणि डाक घर यांच्या प्रमाणाच्या सरासरीवरुन हे स्पष्ट होते की, काही तालुक्यात प्रत्यक्ष डाक घरांची संख्या अतिरिक्त आहे तर काही तालुक्यात प्रत्यक्ष डाक घरांची संख्या कमी आहे. ज्या तालुक्यात डाक घरांची संख्या ही अपेक्षीत डाक घरांच्या संख्येपेक्षा अधिक असेल तर तेथील लोकांना पुरेशा संदेशवहन सेवा उपलब्ध होतात. परंतु ज्या तालुक्यात प्रत्यक्ष डाक घरांची संख्या अपेक्षीत डाक घरांच्या संख्येपेक्षा कमी असेल तर त्या प्रदेशातील लोकांना पुरेशा प्रमाणात संदेशवहन सेवा मिळत नाही. त्यामुळे अशा तालुक्यात नवीन डाक घरांची निर्मिती करणे गरजेचे आहे.

जिंतूर, गंगाखेड, पाथरी आणि मानवत या तालुक्यात अपेक्षित डाक घरांपेक्षा प्रत्यक्ष डाक घर हे अधिक असल्याचे दिसून येते.

अभ्यास क्षेत्रातील प्रत्यक्षातील डाक घर आणि अपेक्षित डाक घर यांचा अभ्यास केला असता प्रत्यक्षात सर्वाधिक डाक घर हे जिंतूर तालुक्यात 39 एवढी आहेत. परंतु या तालुक्यात ग्रामीण क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्या या तिन्हीच्या सरासरी प्रमाणात फक्त 32 डाक घराची आवश्यकता आहे. म्हणजे या तालुक्यात प्रत्यक्षात 07 डाक घर हे अतिरिक्त आहेत. यामुळे या तालुक्यातील लोकांना पुरेशा व मुबलक प्रमाणात संदेशवहन सुविधा उपलब्ध होतात. त्याचबरोबर गंगाखेड तालुक्यात प्रत्यक्षात 24 डाक घर आहेत. परंतु या तालुक्यात अपेक्षीत डाक घर 20 एवढी आहेत. म्हणजेच गंगाखेड तालुक्यात 04 डाक घर हे अतिरिक्त आहेत. पाथरी तालुक्यात प्रत्यक्षात 17 डाक घर आहेत. परंतु या तालुक्यात ग्रामीण क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्या यांच्या प्रमाणात फक्त 14 डाक घराची आवश्यकता आहे. म्हणजेच या तालुक्यात 03 डाक घर हे अतिरिक्त आहेत. मानवत तालुक्यात प्रत्यक्षात 13 डाक घर आहेत. परंतु या तालुक्यात ग्रामीण क्षेत्र, वस्त्या व लोकसंख्या यांच्या प्रमाणात फक्त 12 डाकघरांची आवश्यकता आहे. म्हणजेच या तालुक्यात फक्त 01 डाक घर हे अतिरिक्त आहे.

परभणी जिल्हयातील ग्रामीण क्षेत्र, वस्त्या व लोकसंख्या आणि डाक घर यांच्या प्रमाणाच्या सरासरीच्या आधारे अपेक्षित डाक घरांची संख्या पाहिली असता पूर्णा, पालम, सेलू, परभणी आणि सोनपेठ या तालुक्यात डाक घरांची संख्या कमी असल्यामुळे या तालुक्यात नवीन डाक घर निर्माण करण्याची आवश्यकता आहे. कारण या तालुक्यात प्रत्यक्षातील डाक घरांची संख्या अपेक्षित डाक घरांच्या संख्येपेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

पूर्णा तालुक्यात प्रत्यक्षात 13 डाक घर अस्तित्वात आहेत. परंतु या तालुक्यात 21 डाक घराची आवश्यकता आहे म्हणून या तालुक्यात नवीन 08 डाक घर निर्माण करणे गरजेचे आहे. पालम तालुक्यात प्रत्यक्षात 14 डाकघर उपलब्ध आहेत. परंतु या तालुक्यात प्रत्यक्षात 16 डाकघरांची आवश्यकता आहे. तर सेलु तालुक्यात प्रत्यक्षात 17 डाक घर उपलब्ध आहेत. परंतु या तालुक्यात प्रत्यक्षात 19 डाक घराची आवश्यकता आहे. म्हणजेच पालम व सेलू या दोन्ही तालुक्यात प्रत्येकी 02 नवीन डाक घर निर्माण करावी लागणार आहेत. परभणी तालुक्यात 29 डाक घर उपलब्ध आहेत. या तालुक्यात 30 डाक घराची आवश्यकता आहे. तर सोनपेठ तालुक्यात प्रत्यक्षात 10 डाक घर अस्तित्वात असून या तालुक्यात 11 डाक घरांची आवश्यकता असल्यामुळे परभणी आणि सोनपेठया दोन्ही तालुक्यात प्रत्येकी 01 डाक घर नवीन निर्माण करणे गरजेचे आहे.

***निष्कर्ष :***

परभणी जिल्हयातील डाक घरांच्या वितरणाचा अभ्यास करत असताना या अभ्यास क्षेत्रात एकूण किती डाक घर उपलब्ध आहेत त्यांचे तहसिलनिहाय वितरण कसे आहे हे अभ्यासण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केलेला आहे. हे वितरण अभ्यासत असतेवेळी डाक घर हे त्या त्या प्रदेशात पुरेसे आहेत किंवा नाहीत याचा विचार करण्यात आलेला आहे. याकरिता त्या त्या तहसिलमधील एकूण ग्रामीण क्षेत्र, ग्रामीण वस्त्या व ग्रामीण लोकसंख्या यांचा आधार घेतलेला आहे आणि या तिन्ही घटकांच्या प्रमाणाची पुन्हा सरासरी काढून अपेक्षित डाक घर किती असावीत याचा अभ्यास केलेला आहे.

परभणी जिल्हयातील जिंतूर, गंगाखेड, पाथरी आणि मानवत या तालुक्यात अस्तितत्वात असलेले डाक घर हे अपेक्षित डाक घरांपेक्षा अधिक आहेत. जिंतूर तालुक्यात 07, गंगाखेड 04, पाथरी 03 आणि मानवत तालुक्यात 01 डाक घर हे क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षाही अतिरिक्त आहे. त्यामुळे या तालुक्यातील लोकांना मुबलक प्रमाणात संदेशवहन सेवा उपलब्ध होतात.

पूर्णा, पालम, सेलू परभणी आणि सोनपेठ या तालुक्यात उपलब्ध असलेली डाक घरांची संख्या ही पुरेशी नाही. त्या त्या तहसिलचे ग्रामीण क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्या यांच्या प्रमाणापेक्षाही उपलब्ध असलेली डाक घर हे कमी असल्यामुळे या तालुक्यात नवीन डाक घर निर्माण करणे गरजेचे आहे. पूर्णा तालुक्यात नवीन 08 डाकघर  निर्माण करण्याची आवश्यकता आहे तर पालम व सेलू या दोन तालुक्यात प्रत्येकी 02 नवीन डाकघर निर्माण करणे गरजेचे आहे. तर परभणी आणि गंगाखेड तालुक्यात प्रत्येकी एक डाकघर नवीन निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ :**


1)Davies, W.K.D. (1966) : 'The Ranking of Service Centers : A Critical Review Transaction and Paper' Institute of British Geographers, No.40, Page 52.
2)Gopal Kishan and Chanda M.N. (1977) : 'The System of Service Centers in the Outer Himalayas', Published in Mann Culture and Settlement (Edited by Robert C. Singh K.N. and Rana P.B.) New Delhi.
3)Kankure, K.B. (1986) : 'Marathwada : A Study in Settlement Geography', Unpublished Ph.D. Thesis Poona University, Pune.
4)Mandal, R.B. (1978) : 'Introduction to Rural Settlement', New Delhi Concept Publishing Co.
5)Gone, S.H. (2007) : 'A Study of Geographical Analysis of Market Centres in Parbhani District'. Unpublished Ph.D. Thesis S.R.T.M.U. Nanded.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net